# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

## नोटीस

नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक 20/02/2019 रोजी सकाळी 11–00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे मागिल विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

आदेशान्वये,

हस्ता/–

नागपूर
दिनांक :– 12–02–2019

(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेले प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे .

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नांव | प्रश्न |
|---|---|---|---|
| 1) | 139 | श्री. सतिश विठ्ठलराव होले | पाळी अभियंता यांना कनिष्ठ अभियंता पदामध्ये समायोजित संदर्भात प्रश्न |
| 2) | 140 | श्री. प्रवीण प्रभाकर दटके | मनपाच्या लेखा शाखेमध्ये प्रतिनियुक्तीचे मनपाच्या आस्थापनेनुसार किती पदे आहेत संदर्भात प्रश्न |
| 3) | 141 | श्री. कमलेश दिलीप चौधरी | घराची कर आकरणी संदर्भात प्रश्न |
| 4) | 142 | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | मागील पाच वर्षाचे अर्थसंकल्पामध्ये मालमत्ता कराचे संदर्भात प्रश्न |
| 5) | 143 | सौ. श्रद्धा विजय पाठक | डेंग्यु या रोगावर प्रतिबंध ठेवण्यासाठी, बेपरवाह नागरीकांवर अंकुश ठेवण्या संदर्भात प्रश्न |
| 6) | 144 | श्री. मनोज दशरथ सांगोळे | नागपूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय वर्ष 2015–16, 2016–17 व 2017–18 चे लेखा परीक्षण संदर्भात प्रश्न. |
| 7) | 145 | श्री. मोहम्मद जमाल | नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत बाजार विभागाद्वारे भाडे तत्वावर देण्यात आलेले मनपा मालकीची जागा/गाळे संदर्भात प्रश्न |
| 8) | 146 | श्री. मो. इब्राहिम तौफीक अहमद | आसीनगर झोन अंतर्गत जी.एम. बनातवाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेची इमारत बनवून तयार असून तिथे किरायाच्या घरात सुरु असलेली शाळा स्थानांतरीत संदर्भात प्रश्न |
| 9) | 147 | श्री. जितेंद्र भास्कर घोडेस्वार | मनपा स्लम मालकी हक्काचे पट्टे वाटप संदर्भात प्रश्न |
| 10) | 148 | सौ. स्नेहा विवेक निकोसे | नागपूर महानगरपालिकेत स्वास्थ निरीक्षकांची मंजूर पदे किती यापैकी किती पदे रिक्त संदर्भात प्रश्न |
| 11) | 149 | श्री. तानाजी सुकलाजी वनवे | नागपूर महानगरपालिका सिमा क्षेत्रात आर.ओ. ने 20 लिटर पाण्याच्या कॅनचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या किती? संदर्भात प्रश्न |
| 12) | 150 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव सोनकुसरे | नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सी.बी.एस.सी पॅटर्न किंवा इंग्रजी माध्यम का सुरु करण्यात येत नाही संदर्भात प्रश्न. |
| 13) | 151 | श्री. कमलेश दिलीप चौधरी | नागपूर महानगरपालिकेच्या दहन घाटावर मृतकाचा अग्निसंस्कारास लाकडे व गोवत्त्यांची पुर्तता संदर्भात प्रश्न |
| 14) | 152 | सौ. वनिता सुनिल दांडेकर | मौजा सोमलवाडा ख. क्र. 33, 35 ही जमीन मनपाच्या मालकीची आहे का? संदर्भात प्रश्न |
| 15) | 153 | श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे | वर्ष 2018–19 या आर्थिक वर्षात मा. अध्यक्ष, स्थायी सति यांनी शहरातील नगरसेवक व प्रभागनिहाय किती रकमेचे विकास कामनिहाय प्रावधान उपलब्ध करुन दिले संदर्भात प्रश्न |
| 16) | 154 | सौ. उज्वला वसंतराव बनकर | उद्यान विभागाकडे किती उद्याने असून या उद्यनांपैकी किती उद्याने विकसित करण्यात आली आहे?संदर्भात प्रश्न |
| 17) | 155 | श्री. नागेश गोविंदराव सहारे | नागपूर शहरातील नागरीकांना बेवारस कुत्र्यापासुन होत असलेल्या त्रासा संदर्भात प्रश्न. |
| 18) | 156 | श्री. संजय मधुकर महाकाळकर | नागपूर महानगरपालिके अंतर्गत नेहरुनगर झोन क्र. 5 मध्ये प्रमुख मार्गावर दिवसेंदिवस अस्थायी दुकानदारांचे अतिक्रमण संदर्भात प्रश्न |
| 19) | 157 | श्री. प्रकाश सितराम भोयर | नागपूर महानगरपालिका मालमत्ता कर थकीत असलेल्या नागरिकांचे प्लॉट लिलाव संदर्भात प्रश्न |
| 20) | 158 | श्री. रमेश गणपती पुणेकर | नागपूर शहरात नागपूर महानगरपालिकेच्या झोन निहाय मा. पालकमंत्री यांचे किती जनता दरबार घेण्यांत आले संदर्भात प्रश्न. |

नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे तिमाही अहवाल मा. सदस्यांच्या माहितीस्तव सादर प्रस्तुत.

1. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०४–०८–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
2. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०९–०८–२०१८ रोजी सकाळी ११–०० वाजता
3. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ३१–०८–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
4. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०६–०९–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
5. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १७–०९–२०१८ रोजी दुपारी ०१–०० वाजता
6. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०१–१०–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
7. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०९–१०–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
8. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १९–१०–२०१८ रोजी दुपारी ०१–०० वाजता
9. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ३१–१०–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
10. म.न.पा. स्थायी समिती विशेष सभा दिनांक ०१–११–२०१८ रोजी दुपारी ०१–०० वाजता
11. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १७–११–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
12. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०१–१२–२०१८ रोजी दुपारी ०३–०० वाजता
13. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ११–१२–२०१८ रोजी दुपारी १२–०० वाजता
14. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २१–१२–२०१८ रोजी सकाळी ११–३० वाजता

टिप :– उपरोक्त सभेचे अहवाल नस्तीत उपलब्ध आहे.

नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करणे.

1. स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती.
   1. गुरुवार दि. 29.11.2018 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत
   2. गुरुवार दि. 06.12.2018 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
   3. गुरुवार दि. 03.01.2019 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त
2. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
   1. मंगळवार दि. 23.10.2018 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत
   2. मंगळवार दि. 28.12.2018 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
3. विधी विशेष समिती
   1. सोमवार दि. 17.12.2018 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत
   2. शनिवार दि. 29.12.2018 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
4. महिला बाल कल्याण विशेष समिती
   1. मंगळवार दि. 16.10.2018 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
   2. मंगळवार दि. 27.11.2018 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
   3. शुक्रवार दि. 14.12.2018 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
5. कर आकारणी व कर संकलन विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 12.10.2018 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
6. जलप्रदाय विशेष समिती
   1. मंगळवार दि. 08.01.2019 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त
7. अग्निशमन व विद्युत विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 21.12.2018 सायंकाळी 04.00 वाजता चे कार्यवृत्त

टिप :– उपरोक्त सभेचे कार्यवृत्त समितीच्या सदस्यांना प्रेषित करण्यांत आले आहे.

मागिल विचाराधिन विषय
(दिनांक 24.09.2018)

विषय क्रमांक 216:–
{उद्यान विभाग}

मौजा अंबाझरी येथील अंबाझरी तलावा जवळील खं. क्र. 1 नं. भू. क्र. 1 मधील नागपूर महानगरपालिकेच्या व्यवस्थापनेखाली असलेले 44 एकर क्षेत्र हे शासकीय असून यापैकी उद्यानाचे उत्तरेकडील 19 एकर क्षेत्र महाराष्ट्र पर्यटन विकास

महामंडळातर्फे विकसीत करण्यास व उर्वरित 25 एकर क्षेत्र महानगरपालिकेतर्फे विकसीत करण्यास तसेच या दोन्ही जागेच्या विकासानंतर प्राप्त नफ्याची वाटणी नागपूर महानगरपालिकेस 60% व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास 40% करण्यास शासन स्तरावरील दि. 22.04.2015 चे बैठकीत निश्चित झाल्याप्रमाणे उक्त जागेचे मूळ व्यवस्थापण व विकासानंतर होणारी प्राप्त नफ्याची 60% वाटणी महानगरपालिकेकडे कायम ठेवून उक्त 19 एकर क्षेत्र महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना नागपूर शहराचे मंजूर विकास आराखडयातील आरक्षण व विकास नियंत्रण नियमावलीनूसार विकासाकरिता देण्याकरिता ना–हरकत पत्र देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या दोन्ही जागेच्या विकासानंतर प्राप्त नफ्याची वाटणी नागपूर महानगरपालिकेस 60 टक्के ऐवजी 75 टक्के व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास 40 टक्के ऐवजी 25 टक्के ठेवण्यात यावी, यास नागपूर महानगरपालिकेच्या ठराव क्र. 335 दिनांक 06.10.2015 रोजी भरलेल्या स्थगित साधारण सभेच्या एकमताने मान्यता प्रदान केली.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना भाडेपटटयावर देण्याबाबत उक्त नमूद आदेशानूसार सदर जमीनीचा ताबा स्थावर अधिकरी, महानगरपालिका नागपूर यांच्याकडून उक्त नमूद जमीन व त्यावरील बांधकामासह कोणताही मोबदला न देता महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट) नियम 1971 मधील तरतूदीनूसार ज्या स्थितीत आहे. त्याच स्थितीत नगर भूमापन अधिकारी नागपूर यांचेकडील मोजणी अंती निश्चित झालेली एकूण क्षेत्रफळ 171662.69 चौमी. (42.42 एकर) जमीनीचा ताबा दिनांक 30.01.2018 रोजी देण्यात आला. ताबा देण्यात देण्यात आलेल्या जागेवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांनी अद्याप पर्यंत कोणतेही विकास कामे केलेले नसल्यामूळे त्यांना देण्यात आलेली एकूण 42.42 एकर क्षेत्रातील जागा महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(दिनांक 20.12.2018 रोजी भरलेल्या सभेतील स्थगित विषय)

विषय क्रमांक 244 :– {सचिवालय विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 03.02.2018 चे सर्व साधारण सभेत प्रश्न क्र. 57, 59 व 65 मध्ये झालेल्या चर्चेनुसार मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये, परिवहन विभागासंबंधित चौकशी अति. आयुक्त (2) यांचे मार्फत करण्याचे निर्देश होते. अति. आयुक्त (2) यांनी सादर केलेला चौकशी अहवाल (नस्तीत उपलब्ध प्रमाणे) सभागृहाच्या समक्ष सादर.

टिप :– चौकशी अहवाल नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 245 :– {सचिवालय विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 20.02.2018 चे सर्व साधारण सभेत प्रश्न क्र. 66 मध्ये झालेल्या चर्चेनुसार मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये, प्रवर्तन विभागासंबंधित चौकशी मा. निगम आयुक्त यांचे स्तरावर करण्याचे निर्देश होते. मा. उपायुक्त (1) यांनी सादर केलेला चौकशी अहवाल (नस्तीत उपलब्ध प्रमाणे) सभागृहाच्या समक्ष सादर.

टिप :– चौकशी अहवाल नस्तीत उपलब्ध आहे.

(दिनांक 20.12.2018 रोजी भरलेल्या सभेतील मा. सदस्यांनी सादर केलेले स्थगित नोटीस)

विषय क्रमांक 247 : – (आरोग्य विभाग) (मा. श्री. विजय झलके) गणेश उत्सवा दरम्यान नागपूर शहरात मनपा द्वारे एकूण किती कृत्रीम टॅक लावण्यात आले. त्यांची एकूण संख्या किती? झोननिहाय लावण्यात आलेले कृत्रीम टॅकची जागा व त्यांची संख्या, कृत्रीम टॅकचे झोननिहाय अथवा शहर स्तरावर एकत्रित निविदा काढण्यात आल्या किंवा कोटेशन करण्यात आले किंवा कसे याबाबत माहिती तसेच सदर कामाचे कंत्राट शहर स्तरावर किंवा झोननिहाय कोटेशन एकाच कंत्राटदारास मिळाले किंवा कसे?

सदर कामाचे झोननिहाय प्राकलनाची माहिती व त्यात कंत्राटदारास कृत्रीम टॅक बनविण्या व्यतिरिक्त कोण कोणते काम करणे अपेक्षित होते. तसेच या संपूर्ण कामास कोणत्या हेडमधुन निधी

उपलब्ध करण्यात आले. तसेच त्या संपूर्ण कामाचे देयके अदा झाली अथवा नाही. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 248 : – १) मनपाच्या लेखा शाखेमध्ये प्रतिनियुक्तीचे मनपाच्या (वित्त विभाग) (मा. श्री. प्रवीण दटके) आस्थापनेनुसार किती पदे आहेत. तसेच मनपाच्या लेखा शाखेत प्रतिनियुक्ती व्यतिरिक्त किती शासनाचे सेवानिवृत्त कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना नियुक्ती देतांना शासन निर्णयाच्या अधिन राहून नियुक्ती दिली काय? मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचीका क्र.८५/२००८ संदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरईएम–१५०९/प्र.क्र.५८/२००९/१३ दि. १० जानेवारी २०१० तसेच महा. शासन साप्रवि, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६ शासनाच्या परिपत्रकानुसार अंमलबजावणी झाली काय?

२) मनपाच्या लेखा शाखे मध्ये पदोन्नतीच्या पदावर वेतन श्रेणी ९३००–३४८०० ग्रेड वेतन ४४०० या पदांवर लेखा शाखेत मनपाचे अंदाजपत्रकीय अधिकारी, लेखाधिकारी व निगम लेखापरिक्षक हे पदे असंताना मनपाच्या या पदांवर मनपाचे कर्मचारी वगळून शासनाचे वित्त विभागाचे श्री. जितेंद्र राऊत यांची लेखाधिकारी या पदावर ग्रेड वेतन ५४०० व ४६०० यांची या पदावर पदस्थापना का करण्यात येत आहे?

३) दि. २०/०७/२०१८ च्या वित्त विभागाचे विनंती बदल्याच्या आदेशामध्ये श्री. राजू नत्थूजी शेंडे यांची नागपूर महानगरपालिकेत त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाच्या वित्त विभागाने मनपामध्यें पद रिक्त आहे/नाही याची खातरजमा न करता बदली केल्यामुळे त्याची मनपामध्ये कोणत्या पदावर पदस्थाना करण्यात येईल? किंवा श्री. राऊत किंवा श्री. कावळे यांचे जागेवर त्यांना पदस्थाना देण्यात येणार काय? या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 249 : – (उद्यान/कार्य.अभि.प्रोजेक्ट (नदी–सरोवर) (मा. श्री. हरीश ग्वालबंशी) नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत किती तलाव असून त्या तलावांची नावे काय? या तलावांची देखभाल करण्याची (मा. जबाबदारी कोणत्या विभागाकडे सोपविण्यात आली आहे. सध्या स्थितीत या तलावांची स्थिती कशी आहे. या तलावाचे अस्तित्व कायम राहण्यासाठी महानगरपालिकेकडुन कोणती उपाय योजना तयार करण्यात आली आहे. या संदर्भात सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 250 : – (नगर रचना विभाग) (मा. श्री. तानाजी वनवे) नागपूर सुधार प्रन्यासने, नागपूर महानगरपालिकेला 572 अभिन्यासातील 176 व तद्नंतर 233 अभिन्यास नागरी सुविधाची देखभाल/दुरुस्तीसाठी ना.सु.प्र. ठराव क्र. 40/1094 दि. 08.03.2011 अन्वये अभिन्यासे हस्तांतरीत केलेली आहे. त्यांनुषंगाने आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दिनांक 18.11.2011 ला 572 पैकी 176 व 233 अभिन्यास मनपाने हस्तांतरीत करुन घेतले आहे. परंतु विश्वस्त मंडळाने वरील संपूर्ण बाबींची नोंद घेऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 अन्वये नियमित केलेल्या व विकसित केलेल्या 154 अभिन्यासातील नागरी सुविधांची देखभाल/दुरुस्तीसाठी व या अभिन्यास उपलब्ध असलेल्या मोकळया जागेसह अभिन्यास आहे. त्या स्थितीत नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यास मंजुरी दिली असून या अभिन्यासांपैकी 176 अभिन्यास महानगरपालिकेने हस्तांतरीत करुन घेतले असून 233 व 154 ला महानगरपालिकेकडुन मंजुरी देण्यात आली नाही. या अभिन्यासात विकास कामे करण्याकरिता होत

असलेल्या अनियमिततेवर चर्चा करण्याकरिता या संदर्भात सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 251 : –
(वित्त विभाग)
(मा. सौ. रुपाली ठाकुर)

मनपाच्या अधिनियमाप्रमाणे 5 लाखाच्या खालच्या झोन अंतर्गत सर्व कामाच्या नस्त्या झोन सभापती मार्फत मंजुरीसाठी पाठविण्याची तरतूद असून झोन सहा. आयुक्त कोणत्या नियमानुसार झोन अंतर्गत 3 लाखाच्या कमी रक्कमेच्या कामाच्या फाईल्सला मंजुरी प्रदान करतात. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

## नविन विषय

वि. क्र. 293 :–
{सचिवालय विभाग}

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३)(४) व कलम २३ अन्वये स्थायी समितीचे ८ खालील सदस्य दि. ०१/०३/२०१९ रोजी दुपारनंतर निवृत्त करण्याचा प्रश्न विचारात घेवून कलम २०(५) अन्वये महासभे समक्ष सादर करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास स्थायी समिती ठराव क्र. ५६२ दिनांक ०२.०१.२०१९ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे

| अ.क्र. | सदस्य | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा. श्री. नागेश महादेव मानकर | भारतीय जनता पक्ष |
| २ | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | भारतीय जनता पक्ष |
| ३ | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | भारतीय जनता पक्ष |
| ४ | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | भारतीय जनता पक्ष |
| ५ | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | भारतीय जनता पक्ष |
| ६ | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ७ | मा. श्री मनोज दशरथ सांगोळे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ८ | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | बहुजन समाज पक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (५) अन्वये दि. ०१/०३/२०१९ रोजी दुपारी निवृत्त होत असलेले वरिल १) भारतीय जनता पक्षाचे ५ सदस्य २) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे २ सदस्य ३) बहुजन समाज पक्षाचे १ असे एकुण ८ स्थायी समितीच्या सदस्यांचे जागी त्याच पक्ष/गट/आघाडी चे नविन ८ सदस्यांची नेमणूक वर्ष २०१९–२०२० व वर्ष २०२०–२०२१ करीता करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि. क्र. 294:–
{परिवहन विभाग}

नागपूर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९८ दिनांक २०/०३/२०१८ अन्वये सार्वजनिक सायकली सामाईकरण योजना नागपूर महानगरपालिका तसेच महामेट्रो रेल कार्पोरेशन नागपूर यांचे क्षेत्रात राबविणेकरीता पात्र/इच्छुक ऑपरेटर सोबत करारनामा/सामंजस्य करार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान आहेत.

हयाच धर्तीवर ई–रिक्षा, साईकल, ई–साईकल, ई–स्कुटर, ई–कार करीता स्वतंत्र व सामाईकीकरणासह योजना राबविणेकरीता मा. आयुक्त, म.न.पा. यांना पात्र/इच्छुक ऑपरेटर सोबत करारनामा/सामंजस्य करार करण्याचा सुध्दा अधिकार प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- महामेट्रो कडून दिनांक १०/०१/२०१९ ला जाहिरात द्वारे नागपूर शहराचे नागरिकांसाठी First आणि Last Mile Connectivity करण्याकरीता खाजगी यंत्रणे मार्फत ई–रिक्षा,साईकल,ई–स्कुटर,ई–कार स्वतंत्र व सामाईकीकरणासह प्रस्ताव

मागविण्यात आले आहे. या प्रस्तावामध्ये त्रि–पक्षिय सामंजस्य करार संबंधीत प्राधिकारी यांचे सोबत करण्यात येईल.
वरील प्रमाणे सर्व संबंधीत माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

वि. क्र. 295ः— सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2018—19 या आर्थिक वर्षा
{लोककर्म झोन १०} करीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत मंजूर अनुदानातुन पश्चिम नागपूर क्षेत्रा साठी रू. 12499241/— रक्कमेच्या 04 कामांना मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून शासनाचा आर्थिक सहभाग 50% टक्के रू. 6249622/— व महानगरपलिकेचा आर्थिक सहभाग रू. 6249619/— या अटीवर मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सन 2018—19 च्या एकुण 04 कामाकरीता म.न.पा. चा एकुण 50% आर्थिक सहभाग रू. 6249619/— च्या खर्चाला मंजुरी प्रदान करण्याचा व हा खर्च पद क्र. A42001360905 अंतर्गत करण्यात येईल. याकरीता ठराव क्र. 693 दि. 30.01.2019 नुसार मा. स्थायी समीतीने मंजुरी प्रदान केलेली आहे. करीता उपरोक्त प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेपुढे ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.

| अनु क्र | कामाचे नांव | प्राकलनीय राशी (रू.) | 50% शासन निधी हिस्सा (रू.) | 50% म.न. पा. हिस्सा (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 12 येथील प्रेरणा कॉलनी ते मकरधोकडा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रू. 6017035 | . 3008518 | 3008517 |
| 2 | प्रभाग क्र. 11 येथील संगम नगर गोरेवाडा येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू. 2259902 | 1129951 | 1129951 |
| 3 | प्रभाग क्र. 11 येथील गोरेवाडा मेन रोड ते माधव आश्रम पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू.1722953 | 861477 | 861476 |
| 4 | प्रभाग क्र. 11 येथील बोरगाव येथे गोकुल हाऊसिंग सोसायटी येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू. 2499351 | 1249676 | 1249675 |
| | एकुण राशी | 1,24,99,241 | 62,49,622 | 62,49,619 |

टिप :—
1) स्थायी समिती ठराव क्र. 693 दि. 30.01.2019 ची प्रत सलग्न आहे.
2)सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि. क्र. 296ः— अखिल भारतीय मराठी नाटय परिशदेचे 99 वे अखिल भारतीय
{क्रीडा व सांस्कृ. विभाग} नाटय सम्मेलन येत्या 22, 23, 24 व 25 फेब्रुवारी, 2019 या कालावधीत नागपूर येथे संपन्न होणार आहे. ख्यातनाम नाटय लेखक श्री. प्रमानंद गज्वी हे नाटय संमेलनाध्यक्ष असून व मा. ना. श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, सडक व परिवहन व जहाजराणी, भारत सरकार यांच्या स्वागताध्यक्षाखाली हे नाटय संमेलन दादासाहेब धनवटे नगर विद्यालयाचे रेशीमबाग मैदान व कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे आयोजित करण्यात येणार आहे. आजपर्यंत देशविदेशात 98 नाटय संमेलने संपन्न झालेली आहेत. 99 व्या नाटय संमेलनाच्या आयोजनाचा सन्मान यंदाचे वर्षी नागपूर नगरीला प्राप्त झाला आहे. त्यामुळे केवळ नागपूरकरच नव्हे तर, संपूर्ण विदर्भातील रंगकर्मी व नाटयप्रेमींमध्ये आनंदाची व उत्साहाची लाट निर्माण झाली आहे. संमेलनाने रंगभूमीला नवचैतन्य प्राप्त होणार आहे. राज्य शासन या नाटय संमेलनाकरिता दरवर्षी रू. 50 लक्षाचा निधी देत असते. यावर्षी सुध्दा नागपूरच्या नाटय संमेलनाकरिता राज्यशासन रू. 50 लक्षाचा निधी उपलब्ध करून देणार आहे. नागपूरात होणारे हे नाटय संमेलन नागपूरकरांसाठी अभिमानाची व सन्मानाची गोष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नाटय संमेलनाला राजाश्रय देण्याची भुमिका म.न. पा. स्थायी समितीची आहे. कविवर्य सुरेश भट सभागृहात हे संमेलन होणार असल्यामुळे व हे व्यावसायिक नसल्यामुळे सभागृह दि. 20/02/2019 ते 25/02/2019 पर्यंत विनाशुल्क देण्यास मंजुरी प्रदान करते. तसेच या संमेलनाकरिता नागपूर महानगरपालिका कुठल्याही प्रकारचा थेट निधी या नाटय संमेलनाला उपलब्ध करून न देता सहप्रायोजक म्हणून ज्या ज्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देता येईल त्या सोयी व सुविधेचा खर्च निविदा काढून महानगरपालिका स्वतः करेल. यामध्ये कविवर्य सुरेश भट सभागृह व रेशीमबाग मैदानावरील रंगमंच व्यवस्था, रंगमंच सजावट व्यवस्था, मंडप, इतर सुशोभीकरण व्यवस्था, आसन व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, रंगमंच प्रकाश व्यवस्था, परिसर व इतर विद्युत

व्यवस्था, छायाचित्र व व्हिडिओ शुटिंग व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, फ्लेक्स प्रिंटींग द्वारे प्रसिध्दि, भोजन व्यवस्था, रंगमंच व इतर ठिकाणी एल. ई. डी. वॉलची व्यवस्था, बस परिवहन व्यवस्था व इतर आवश्यक व्यवस्था तसेच या कार्यक्रमात नामदार, पदाधिकारी व प्रसिध्द नाटयकर्मी उपस्थित राहणार असल्यामुळे नागपूर शहराच्या इतिहासाची प्रसिध्दि होण्याच्या दृष्टीने म.न.पा. च्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी गौरव ग्रंथाचे वितरण करण्यासाठी 100 प्रतीची व्यवस्था करावी. अशा विविध आवश्यक व्यवस्थेद्वारे महानगरपालिका मदत करेल. याकरिता येणाऱ्या खर्चास सन् 2018–19 च्या अर्थसंकल्पीय पद क्र. ए 26502242214 (महोत्सव अंशदान) मधून रू. 1,25,00,000/– यास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस मंजूरी प्रदान करते.

नाटय संमेलनाबाबत विभागाने वरील सर्व नमूद बाबींचे प्राकलन तयार करून ज्या व्यवस्थेबाबत आवेदन करावयाचे आहे व ज्या व्यवस्थेबाबत निविदा काढावयाच्या आहे याची प्रक्रिया करण्याची सुरूवात करून या निविदा लघुनिविदेद्वारे काढण्यात याव्यात. तसेच हा प्रस्ताव धोरणात्मक बाब असल्यामुळे विभागाने म.न.पा. सभागृहाची रितसर परवानगी घेण्यासाठी अंतीम मंजुरीकरिता महासभेकडे पाठवावा.

वि. क्र. 297:– विकास योजना –नागपूर.

{नगर रचना विभाग} मौजा – भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर., जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना ही शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस–२४९६/२६४३/प्र.क्र.३००(अ)/९७ / नवि–९, दि. ०७.०१.२००० व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस –२४००/१६२८/प्र.क्र.२००/२०००/नवि –९, दि. १०. ०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि.०१.०३.२००० व दि. २१.०९.२००१ पासून अंमलात आली आहे. शासनाने नागपूर शहराची विकास योजना भागशः दि. ०७.०१.२००० रोजी मंजुर करून वगळलेल्या भागाची (Excluded Part) विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–२४९६– २६४३–प्र. क्र. ३३०(बी)–९७ – नवि –९, दि. ०७.०१.२००० अन्वये पुनःप्रसिध्द केलेली होती. उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने निर्णय क्र. टिपीएस–२४००–१६२८–प्र.क्र. २००–२०००–नवि–९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर केली असून सदर विकास योजना दि. २१. ०९.२००१ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस– २४०१/८५५/प्र.क्र. ७६/ नवि–९, दि. २७.०२.२००२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस नागपूर सुधार प्रन्यासच्या ७ योजनाखालील क्षेत्र सोडून उर्वरीत नागपूर शहरातील संपुर्ण क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मौजा – भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर ही जमीन शेती जमीन वापर क्षेत्रात अंतर्भूत आहे. उक्त जागेचा जमीन वापर बदलवून रहिवासी जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे प्रस्तावित असून सदर क्षेत्राकरीता महानगरपालिका, नागपूर हे नियोजन प्राधिकरण आहे.

शासन निर्देश क्र. टिपीएस–२४१६/प्र.क्र. ४३/१६/नवि–९, दि. २०.०४.२०१६ अन्वये कलम ३७ अन्वये फेरबदलास मंजुरी देतांना, प्रस्तावाखालील जमिनीच्या वार्षिक मुल्यदर तक्त्यातील (Annual Statement Rates) संबंधीत जमीन मुल्यदराच्या ५% दराने अधिमुल्य आकारण्याबाबत व अशा अधिमुल्य रकमेमधून शासनास मिळणाऱ्या ५०% हिश्याच्या रकमेचा भरणा शासनाच्यावतीने स्थानिक नगर रचना अधिकारी यांचेकडील लेखाशिर्षाखाली चलनाव्दारे भरणे व उर्वरीत ५०% रक्कम नियोजन प्राधिकरण यांच्या लेखाशिर्ष खाली अर्जदारास जमा करणे आवश्यक आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा – भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर., या जमिनीचा शेती हा जमिन वापर बदलवून उक्त जमिन रहिवासी जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करण्यास्तव महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

वि. क्र. 298:— जाहीरात क्र. 520/पी.आर दि. 17/01/2018 च्या अनुषंगाने सहा. आयुक्त {सा.प्र.वि.} /वार्ड अधिकारी (अज)—01 पदाकरीता जाहीरात देण्यात आलेली होती. या जाहीरातीच्या अनुषंगाने 24 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असुन 6 उमेदवार अर्ज पडताळणी अपात्र ठरले. उर्वरीत 18 उमेदवारांची लेखी परिक्षा महाऑनलाईन तर्फे दि. 06/10/2018 ला घेण्यात आली.

लेखी परिक्षेतील 18 उमेदवारांपैकी शासन निर्णय दि. 19/10/2007 नुसार परिक्षेत प्राप्त गुणांनुक्रमानुसार 5 उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता दि. 08/02/2019 रोजी बोलाविण्यात येवून निवड समितीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा निकाल, तसेच निवड यादी व प्रतिक्षा यादी नागपूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द दि. 08/02/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आला.

दि. 08/02/2019 रोजी घेण्यात आलेल्या प्रत्यक्ष मुलाखती मध्ये लेखी परिक्षेत व मुलाखतीत गुणवत्ता यादीनुसार श्री. घनश्याम जी. पंधरे यांचे निवड यादीत असुन प्रतिक्षा यादीत श्री. योगेश श्रीराम गेडाम यांचे नांव आहे.

सहा. आयुक्त हे पद वर्ग 1 दर्जाचे असल्यामुळे या पदाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) नुसार नियुक्ती प्राधीकरण म.न.पा. महासभा असल्यामुळे वरील उमेदवारांस नियुक्ती देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत संलग्न.

———————————